# मुंबईबाबत खेतान यांची वरिष्ठांसोबत चर्चा

**मुंबई :** एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲंड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान यांनी अलीकडेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, एमपीसीपीचे अध्यक्ष सिद्धेश कदम तसेच शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्या व प्रवक्त्या शाइना एनसी जी यांच्यासोबत एक सौहार्दपूर्ण बैठक घेतली. मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शाश्वत प्रगतीसाठी महत्त्वाच्या जनहित विषयांवर सखोल चर्चा करण्यासाठी ही बैठक एक प्रभावी मंच ठरली. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसाठी नागरिक-केंद्रित प्रशासन, आर्थिक उन्नती आणि दीर्घकालीन शहरी सक्षमतेबाबत सर्वांची समान बांधिलकी या चर्चेतून स्पष्ट झाली. या बैठकीदरम्यान पायाभूत सुविधांमधील अडथळे, वाहतूक कोंडी, रस्ते सुरक्षितता, शहरी पाणी तुंबण्याची समस्या, परवडणारी घरे या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विकासाला गती देताना जनहिताचे संरक्षण करण्यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी, कायदेशीर सुधारणा आणि पारदर्शक नियामक यंत्रणेची आवश्यकता असल्याचे मत अक्षत खेतान यांनी व्यक्त केले. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केंद्र व राज्य सरकार मुंबईसमोरील पायाभूत व नागरी समस्यांच्या निराकरणासाठी समन्वयित नियोजन आणि वेळेत अंमलबजावणी करण्यास पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.